कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी प्रकल्पांतर्गत शिरोळ तालुक्यातील तेरवाड को. प. बंधाऱ्याचे विशेष दुरूस्ती कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१७/ (प्र०.क्र. ३३५/२०१७)/सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १३ /०९ /२०१७.

वाचा :- १. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृखोविम-२/(३८६/२०१७)/प्रशा-३/२६१७, दि. २९.०६.२०१७
२. शासन निर्णय संकीर्ण २०१६/(२७/२०१६)/लपा-२, दि.२६.०५.२०१७.

प्रस्तावना :-

कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी प्रकल्पांतर्गत शिरोळ तालुक्यातील तेरवाड को. प. बंधारा हा पंचगंगा नदीवरील बंधारा असून सन १९४८ मध्ये पूर्ण करण्यात आलेला आहे. सन १९४८ मध्ये सदर प्रकल्प सिंचन व्यवस्थापन व देखभाल दुरूस्तीकरीता हस्तांतरीत झाला आहे. सदर बंधाऱ्यावरती रब्बी, उन्हाळी हंगामामध्ये राधानगरी धरणातून भोगावती नदीद्वारे सिंचन केले जाते. शिंरोळ तालुक्यातील या बंधाऱ्यावरती ५९६५ हे. क्षेत्र उपसा सिंचनाद्वारे भिजवले जाते. तसेच साखर कारखाने व ग्रामपंचायती कडून पिण्यासाठी व औद्योगिक कारणासाठी पाण्याचा वापर केला जातो. सदर अंदाजपत्रकात को. प. बंधाऱ्याच्या गाळ्यातील खाचा दुरुस्ती करणे, बंधाऱ्यातील स्लॅबच्या तळाशी गनायटींग करणे, बंधाऱ्यातील सिलचे काँक्रीट करणे, बंधाऱ्यातील U/S चे Pilar च्या पुढील भागाचे गोल काँक्रीट करणे, बंधाऱ्यावरील स्लॅबवर संधानक (Wearing coat) करणे अशा दुरुस्तीची कामे प्रस्तावित आहेत. सदर बंधारा दुरुस्त करणेसाठी स्थानिक प्रतिनिधींची आग्रही आहेत. सदर बंधाऱ्याचे मजबुतीकरण करुन बंधाऱ्यात पूर्णक्षमतेने पाणीसाठा करुन ५९६५ हे. क्षेत्रा व्यतिरिक्त ४० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. याअनुषंगाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये विभागास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर दुरूस्तीच्या कामाकरीता विशेष दुरूस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी प्रकल्पांतर्गत शिरोळ तालुक्यातील तेरवाड को. प. बंधाऱ्याच्या दुरूस्तीच्या कामांसाठी विशेष दुरूस्ती अंतर्गत संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये प्रस्तावित कामांच्या रू. ६६.७५**/-लक्ष** व अनुषंगिक खर्च रू. ३.३०/- लक्ष अशा एकूण रू. **७०.०५/-** लक्ष (रू. सत्तर लक्ष पाच हजार फक्त) एवढया खर्चाच्या प्रस्तावास संदर्भ

क्र.२ येथील शासन निर्णयान्वये विभागास दिलेल्या अधिकारान्वये व आंतरवित्त सल्लागार तथा उप सचिव यांच्या सहमतीने खालील अटींच्या अधीन राहून सोबतच्या प्रपत्रानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे), दि.१.०१.२०१५ मधील मार्गदर्शक सूचनानुसार अभिलेखे ठेवणे व कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
२. प्रकल्पा वरील पाणी वापर संस्थेकडे संपूर्ण लाभक्षेत्र हस्तांतरणाचे नियोजन काम सुरु करण्यापूर्वी करावे; कामे पूर्ण झाल्यानंतर लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करावे.
३. अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे / संकल्पने , बाहय दरसूची बाबी व वहन अंतरे सक्षमस्तरावर तपासून अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करावी.
४. कालवा स्वच्छता व माती भरावाची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीने करावीत. तथापि, यांत्रिकी संघटनेकडे मशिनरी उपलब्ध नसल्यास तसे प्रमाणपत्र यांत्रिकी संघटनेकडून प्राप्त करून घ्यावे.
५. कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा.
६. सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावे.

प्रस्तावित कामासाठी होणारा खर्च ४७०२ लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च,१९० सार्वजनिक व इतर उपक्रमातील गुंतवणूका (१०) उर्वरित महाराष्ट्र, (१०) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (विशेष दुरुस्ती / विस्तार व सुधारणा)(उर्वरित महाराष्ट्र) (४७०२ ७४५२) या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य.(कामे), कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये क्र. ३४ सन २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१३१७३१५२२६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2017.09.13 17:23:56 +05'30'

(अ.अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

सोबत :- परिशिष्ट-अ

प्रत :-
१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय.
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा.विरोधीपक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६) मा.विरोधीपक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७) मा.मंत्री,जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव(जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०) सचिव(जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१३) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१४) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१५) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर.
१७) कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग(उत्तर), कोल्हापूर.
१८) सिं.व्य. (कामे) कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१७/(प्र.क्र. ३३५/२०१७)/ सिं.व्य.(कामे) दि. १३/०९/२०१७ चे सहपत्र

परिशिष्ट-अ

अ.क्र.	**कामाचा तपशील**	**प्र.मा.रक्कम (रूपये लक्ष)**
१	**२**	**३**
१	पिचिंग दुरुस्ती	४.१७
२	माथ्यावरील रस्ता दुरुस्ती Wearing coat on slab	०.९१
३	इतर कामे	६१.०१
	एकूण बांधकाम खर्च	**६६.०९**
	१% इन्शुरन्स	०.६६
	एकूण	**६६.७५**
	अनुषंगिक खर्च	३.३०
	एकूण	**७०.०५**

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2017.09.13 17:26:02 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव